# एक देश एक बाजार : शेतकऱ्यांची बंधनातुन मुक्ती !

डॉ. हर्षा कौसडीकर
कृषी अर्थशास्त्र विभाग
व.ना.म.कृ.वि., परभणी

सतीश गाजरे
तांत्रिक अधिकारी,
मग्रारोहयो




कोरोनाकाळात संपूर्ण जगाची आर्थिक परिस्थिती बिकट असुन त्यातून मार्ग काढण्यासाठी सर्वच देश आपआपल्या पद्धतीने प्रयत्नशील आहेत. असे असतानाच आपल्या देशातही विविध मार्गाने आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न सरकारतर्फे सुरु असल्याचे दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचे महत्वाचे स्थान आहे. देशातील आर्थिक स्थिती, जीवन-निर्वाह, विदेशी व्यापार, उद्योग यांमध्ये शेती व शेतकरी वर्गाचे सशक्त स्थान कुणीही नाकारू शकत नाही. भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देणे, आंतरराष्ट्रीय बाजारात टिकुन ठेवणाऱ्या शेतीला व शेतीमालास अंतर्गत कळा दिसून येते. आतापर्यंत इतर क्षेत्रातील आधुनिकीकरणामुळे त्या त्या क्षेत्रात परिवर्तन दिसुन आले. कृषी क्षेत्रासाठी विविध योजना राबविण्यात आल्या, यातील बहुतांश योजनांचा शेतकरी लाभ घेतात. अशा योजनांद्वारे शेतकरी आत्मनिर्भर होण्यास मदत होते. परंतु कृषी विपणनास बंधने असल्याने फारसे परिवर्तन दिसुन आले नाही. आता मात्र या बंधनातुन शेतकरी वर्गाची सुटका होईल अशी आशा आहे.

विपणन क्षेत्रासाठी एक अत्यंत महत्वपुर्ण योजना राज्यात लागु झाली आहे. हि योजना म्हणजे “एक देश एक बाजार”. या केंद्र सरकारच्या योजनेला राज्य सरकारने हिरवा कंदील दाखवत, ‘शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे व्यापार आणि व्यवहार (प्रचलन व सुविधा) अध्यादेश २०२०’ च्या अंमलबजावणीबाबत राज्य शासनाच्या सुचनेनुसार प्रभावी अंमलबजावणी ५ जुन २०२० पासुन सुरु झाली असून नव्याने आलेल्या सुचनांची प्रभावी अंमलबजावणी तत्काळ लागु करण्यात आली आहे.

ज्याप्रमाणे सन २०१४ मध्ये शासनाने फळे व भाजीपाला नियममुक्त केला होता, त्याचप्रमाणे आता अन्नधान्यदेखील नियममुक्त करण्यात आले आहे. कोणतेही बाजार शुल्क किंवा उपकर, कोणत्याही बाजार समिती कायद्याच्या आधीन किंवा कोणत्याही इतर राज्याच्या कायद्यानुसार आकारले जाणारे शुल्क, व्यापार क्षेत्रात कोणताही शेतकरी, व्यापारी, इलेक्ट्रॉनिक व्यापार व व्यवहाराच्या व्यासपीठ यांद्वारे शेतकरी उत्पादनाचा व्यापार केल्यास त्याबद्दल कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. सन २००३ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा (APMC Act) मध्ये काही बदल करण्यात आले होते तरी देखील विपणन क्षेत्रात म्हणावी अशी प्रगती पहावयास मिळाली नाही. मग नेमकी सद्यस्थिती काय होती?

### सध्याची स्थिती:

उत्पादनानंतर मालाची साठवणूक, निगा, वाहतूक व्यवस्था, बाजारातील सुविधा, विक्री अशा विपणन प्रक्रियांमध्ये व्यापारी, आडते, दलाल यांचे विशेष महत्व दिसते. यामुळे त्यांना मालाचा योग्य मोबदला मिळत नाही. शेतकऱ्यांच्या मालाची लुबाडणूक होऊ नये, त्याच्या मालाला योग्य भाव मिळावा, किंमत मिळण्यासाठी लिलाव पद्धतीत स्पर्धा व्हावी व शेतकऱ्याच्या शेतमालाला हमी भाव देता यावा यासाठी सन १९६४ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा करण्यात आला. कालांतराने या कायद्यामध्ये वेळोवेळी बदलही करण्यात आले.

- सध्या शेतकऱ्यांना कृषी बाजारात शेतीमाल विकावा लागतो. शेतकऱ्यांचा माल बाजारात आल्यानंतर त्याचा उघड लिलाव पद्धतीने लिलाव करण्यात येतो व त्यानंतरच त्या मालाची विक्री करावी असा दंडक घालण्यात आला.
- कृषी उत्पन्न बाजार समिती हा राज्य सरकारचा कायदा आहे. यामध्ये ठरलेल्या मंडईमध्येच शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल विकण्यास मुभा होती तसेच त्याचे दर ठरवण्याचा अधिकार राज्य शासनाला असे.
- याशिवाय, आंतरराज्य विक्रीलाही विनाकर परवानगी नाही पण नव्या अध्यादेशामुळे शेतकरी त्यांचा शेतमाल कुठेही विक्री करू शकतात.
- जीवनावश्यक वस्तुच्या म्हणजेच अन्नधान्य, डाळी, बटाटे, कांदा यांच्या भांडारग्रहण आणि किंमतीवर राज्य शासनाचे नियंत्रण आहे.

### कृषी विपणन पद्धतीतील महत्वाचे दोष:


- **शेतमाल साठवणूक व सुविधांची कमतरता:** शेतकऱ्यांना शेतमाल साठवणूक व सुविधांची कमतरता असल्याकारणाने उत्पादन केलेल्या वस्तु न साठवता ताबडतोब मिळेल त्या किमतीत विकाव्या लागतात.
- **मध्यस्थांचे वर्चस्व:** शेतकऱ्यांना मिळणारी किंमत आणि उपभोक्ता देत असलेली किंमत यात मोठी तफावत आहे, कारण विपणन क्षेत्रातील अनावश्यक मध्यस्थिंची साखळी. या साखळीमध्ये सावकार, फिरते व्यापारी, दलाल, आडते, घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी इ. समावेश होतो. हि साखळी शेतकरी व उपभोक्ता या दोघांचेही आर्थिक शोषणास कारणीभूत ठरते.

- **वाहतूक व दळणवळण सुविधांची कमतरता:** भारतातील ग्रामीण व शहरी भागांना जोडणारी साधने अपुरी असुन रस्तेदेखील फारसे चांगले नाहीत. त्यात पैसा, वेळ आणि शक्तीही खर्च होते शिवाय, शेतकऱ्याला हवी असलेली किंमत मिळेल याचीही खात्री नसते.
- **अनुसूचित व्यवहार पद्धती:** उत्पादन प्रक्रियेत शेतकऱ्याचे कष्ट, लागवडीसाठीचा पैसा असुनही त्याला त्याच्या शेतमालाची किंमत ठरविण्याचा अधिकार नाही हे त्याचे दुर्दैवच म्हणाव लागेल. भारतीय शेतकऱ्याला त्याच्या अडाणीपणामुळे व निरक्षरतेमुळे सावकारांपासून ते किरकोळ व्यापाऱ्यांपर्यंत सर्वच जन लुबाडण्याचा प्रयत्न करत असतात.
- **मर्यादित व नियंत्रित बाजारपेठा:** शेतकऱ्यांना उपलब्ध असणाऱ्या बाजारपेठा या मर्यादित व नियंत्रित असल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्यास असमर्थ ठरतात.

पूर्वी शेतकऱ्यांचा माल बाजापेठेत आल्यानंतर शेतकरी राजा होता. तो बाजारपेठेत माल आणतो यामुळेच आपला व्यवहार चालतो, त्यातुनच आपल्याला दोन पैसे मिळतात याची जाणीव आडत्याला होती. परंतु आता मात्र ‘आडता हा कडता’ वाटतोय. याशिवाय बाजारात काम करणारा हमाल, चाळणी करणारे मजुर यांना मजुरीव्यतिरिक्त राहिलेले मातेरे शेतकरी स्वखुशीने देत. मात्र आता स्थिती बदललेली आहे. उत्पन्नापेक्षा खर्च वाढल्याने आगोदरच गांगारलेला शेतकरी जेव्हा त्याचा माल बाजारात घेऊन जातो तेव्हा त्याची लुबाडणूक होते. शिवाय, मालास योग्य किंमत मिळेलच याची खात्रीही नसते. त्यामुळेच एक देश एक बाजार या योजनेकडून शेतकरी वर्गाला दिलासा मिळेल आणि शेतकरी पुर्वीसारखाच राजा बनेल अशी अपेक्षा आहे.

**एक देश एक बाजार** योजनेतुन काही महत्त्वपुर्ण बदल घडून येतील जसे की:-

**इतर राज्यात विक्री सहजता:** आजपर्यंत शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल विनामुल्य त्यांच्याच प्रदेशात विकण्याचा अधिकार होता. त्यांच्या शेतमालाची प्रत उच्च असेल तरीदेखील रास्त भावात त्यांचा शेतमाल विकावा लागत असे. परंतु या योजनेमुळे आता हि प्रथा मोडीस जाणार आहे.




उदाहरणार्थ, ज्या राज्यात तांदुळ जास्त पिकतो त्या प्रदेशात तांदुळाची किंमत हि कमी असते, याउलट ज्या राज्यात तांदुळ जास्त पिकात नाही तिकडे तांदुळाची किंमत आणि मागणी हि जास्त असते. त्यामुळे आता ज्या राज्यात तांदुळ उत्पादन होत नाही किंवा कमी होते अशा ठिकाणी भारतातील कोणताही शेतकरी आपले तांदुळ विनाकर विकुन जास्त किंमत मिळवु शकतो. यासाठी आता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यातही तरतुद करण्यात आली आहे, ज्यामध्ये स्थानीय बाजारातच शेतमाल विकणे हे बंधनकारक नाही. तसेच बाजार समितीच्या आवाराबाहेर होणाऱ्या शेतमालाच्या खरेदी-विक्रीवर कोणतेही बाजार शुल्क आकारले जाणार नाही.

**संपर्क शेती:** शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल हा थेट ठोक विक्रेते, तसेच मोठे निर्यातदार यांच्याशी करार करुन विक्रीमध्ये अडचणी होत्या. या नव्या बदलामुळे महाराष्ट्रातील शेतकरी देशात कुठेही सर्व प्रकारचा शेतीमाल विक्री करू शकतो. एवढेच नाही तर खरेदीदार थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरेदी करू शकेल. याचाच अर्थ असा की, मोठ्या कंपन्या थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांना लागणारा शेतमाल खरेदी करू शकतील.



उदाहरणार्थ, बटाटा उत्पादक शेतकरी त्याच्या शेतातील बटाटे बाजारात न विकता, थेट वेफर्स कंपनीशी करार करुन कोणतेही बाजार शुल्क न भरता विकु शकेल. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळुन कंपनीचाही उत्पादन खर्च कमी होईल व सामान्य माणसांना ती वस्तु योग्य दरात उपलब्ध होईल.

**गट शेती:**



लहान शेतकरी/ उत्पादकांसाठी देखील हि योजना वरदान ठरू शकते, परंतु त्यासाठी शेतकऱ्यांचा गट होणे आवश्यक आहे. गट शेतीतून विपणन हे अशा शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर असून यातून शेतीच्या

अनेक नवीन संकल्पनातून विपणन सुकर आणि यशस्वी होऊ शकते. शेतकऱ्यांच्या याच एका समुहाचे "शेतकरी उत्पादक कंपनी" मध्ये रुपांतर होऊन अनेक मोठमोठ्या कंपन्यासोबत थेट कायदेशीर व्यवहार होऊन कमी शेती असणारा शेतकरी देखील भरपुर फायदा मिळवु शकतो.

**व्यवहारावरील नियंत्रण:** बाजार सामित्यामध्येच शेतमाल विक्रीच्या बंधनातुन मुक्तता केंद्राने केली आहे. राज्यांच्या कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा अस्तित्वात राहील मात्र या अंतर्गत येणाऱ्या बाजार समित्यांच्या बाहेरील क्षेत्रात कोणतेही सहकारी संस्था, व्यक्ती, खासगी कंपन्याही थेट शेतकऱ्यांकडून माल खरेदी करू शकेल. या खरेदी-विक्रीवर कोणताही कर आकारला जाणार नाही. खरेदीनंतर शेतकऱ्यांना तीन दिवसात रक्कम देणे बंधनकारक असेल. शेतकरी आणि व्यापारी यांच्यात काही वाद झाला तर प्रांतअधिकाऱ्याने ३० दिवसात हा वाद सोडवावा. त्यावर जिल्हाधिकाऱ्याकडेही दाद मागता येईल.



**कोण खरेदी करू शकतो:** कोणतीही व्यक्ती किंवा आयकर भरणारी कंपनी शेतकऱ्यांकडून थेट शेतमाल खरेदी करू शकेल किंवा केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या कागदपत्रांनुसार कायमस्वरूपी खाते क्रमांक असलेली कोणतीही व्यक्ती खरेदी करू शकेल.

**व्यापाराचे क्षेत्र:** नव्या नियमानुसार नियममुक्त व्यापार क्षेत्र म्हणजे कोणतेही क्षेत्र, स्थान, यामध्ये उत्पादनाचे ठिकाण, त्यांचा संग्रह यांच्या समावेशासह, कारखाना परिसर, गोदाम, शीतगृह किंवा कोणतेही संचरना ठिकाणे जेथून भारताच्या हद्दीत शेतकरी उत्पादनाचा व्यापार केला जाऊ शकतो असा परिसर.



**राष्ट्रीय कृषी बाजार (e-NAM):**




केंद्र शासनाने शेतीमालाच्या खरेदी-विक्रीसाठी देशपातळीवर एक बाजार या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय कृषी बाजार (e-NAM) योजना १४ एप्रिल २०१६ पासून देशात सुरु केली. ई-ट्रेडिंग च्या माध्यमातून शेतमालाची विक्री व्हावी व शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळावा हा त्यामागचा हेतु. ई- लिलाव पध्दतीने संगणकीय प्रणालीचा वापर करुन शेतमालाची आवक नोंद, वजन, लिलाव प्रक्रिया, शेतकरी, तसेच अन्य घटकांना द्यायची रकमेची बिले तयार करणे, शेतमालाची जावक याची नोंद करणे या सर्व बाबी यात समाविष्ट आहेत. त्यामुळे संपुर्ण कामकाजात सुसुत्रता तसेच पारदर्शकता दिसुन येते.

**उद्देश:**

- शेतकऱ्यांच्या मालाच्या योग्यतेप्रमाणे त्यांना किंमत प्राप्त करुन देणे.
- e-NAM योजनेचा लाभ हा फक्त शेतकऱ्यांनाच नव्हे तर ग्राहक आणि घाऊक व्यापारी यांनाही घेता येतो.
- विपणन क्षेत्रातील दलाल व मध्यस्थींचा हस्तक्षेप कमी करणे.

या सर्व बाबींमुळे ई-ट्रेडिंगसाठी इच्छुक असणाऱ्या व्यापाऱ्यांना आता नोंदणीचे प्रमाणपत्र ऑनलाईन घेता येणार आहे. राज्यातील खरेदीदार व्यापाऱ्यांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यास योग्य मोबदला मिळेल. शिवाय, ई-पेमेंटद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट पैसे जमा करण्याची सुविधाही आहे.

एकुणच काय शेतकऱ्यांना सोन्याचे दिवस आणणाऱ्या या दोन्ही योजनांची सांगड घातल्याने आता कृषी विपणन क्षेत्रात शेतकरी स्वतः विक्रेते बनुन इतर राज्यात व मोठ मोठ्या कंपन्यांशी थेट व्यापार करू शकतात. या योजनेतील विनाकर विक्रीमुळे शेतकरी निर्बाधीतपणे त्यांना हव्या त्या ठिकाणी त्यांचा शेतमाल विक्री करुन योग्य ती किंमत मिळवू शकतात. या योजनेमुळे प्रामुख्याने शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाच्या विक्रीसाठी विविध मार्ग मोकळे करुन, त्यांना जास्तीत जास्त किफायतशीरपणे विक्री करता यावी व त्यांचे दरडोई उत्पन्नात वाढ व्हावी. तसेच, बाजार मध्यस्थीच्या हस्तक्षेपाला आळा घालणे, कृषी विपणनाचा खर्च कमी करणे, उत्पादक व खरेदीकर्ता यांच्या थेट व्यवहारावर भर देणे यांसारख्या गोष्टीवर भर दिला आहे असे दिसुन येते.

★★★ (संपर्क: +९१ ७७६७९७१२१८)